मार्गदर्शन

# कापूस पिकाची वेचणी, साठवण तसेच प्रतवारी करताना घ्यावयाची काळजी




डॉ. संजीव पाटील
(मो.नं. ७९७२०७३४७५)
तुषार पाटील
डॉ. सुदाम पाटील
डॉ. सुमेरसिंग राजपूत
कृषी संशोधन केंद्र, जळगाव








कापूस पिकाची वेचणी केल्यानंतर साठवणीसाठी नेताना कापसाला बांधावरील गवत तसेच काडीकचरा लागणार नाही याची काळजी घ्यावी. वेचणी केल्यानंतर २ ते ३ दिवस कापूस चांगला वाळवावा व त्यानंतरच साठवावा. प्रत्येक वेचणीचा कापूस वेगळा व जातवार साठवावा. कापसाच्या साठवणीसाठी मोकळी हवा असलेली व स्वच्छ जागा निवडावी. तसेच धूळ, धूर व उंदीर यांपासून कापसाचे संरक्षण करावे.

महाराष्ट्र राज्यात कापूस हे एक महत्त्वाचे नगदी पीक असून या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. सध्या कापूस पिकाच्या वेचणीचे काम सुरु झाले असून, कापूस वेचणी करताना योग्य काळजी घेतल्यास कापसाला योग्य भाव मिळतो व कापसाची गुणवत्ता देखील चांगली राहते. त्यासाठी कापूस पिकाची वेचणी करताना खालील बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

### स्वच्छ वेचणी अशी करावी

१. शेतात ३० ते ४० टक्के बोंडे फुटल्यावर पिकास पाणी देणे बंद करावे व पहिली वेचणी सुरु करावी. कारण यानंतर पाणी दिल्यास पिकाची कायिक वाढ जास्त होते. तसेच आर्द्रता वाढल्याने किडी व रोगांचा प्रादुर्भाव जास्त होतो व कापसाची गुणवत्ता देखील कमी होते. २. कापूस पिकाची वेचणी करताना शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी करावी. कारण त्यावेळी हवेत आर्द्रता असल्याने कापसाला काडी, कचरा, वाळलेली पाने इ. चिकटत नाहीत. ३. कापूस पिकाची वेचणी करताना कवडी, रोगग्रस्त कापूस तसेच जमिनीवर पडलेला कापूस व नख्या इत्यादी येणार नाही याची काळजी घ्यावी. पिवळसर कापूस वेगळा वेचावा. ४. नंतरची वेचणी १५-२० दिवसांच्या अंतराने करावी. ५. पूर्ण परिपक्व व पूर्ण उमललेल्या बोंडातील कापूस वेचावा. अपरिपक्व, पूर्ण न उमललेल्या ओल्या बोंडातील कापूस वेचू नये. ६. कापूस पिकाची वेचणी करताना प्लास्टिक गोण्यांचा वापर करू नये कारण प्लास्टिक दोरे, तुकडे इत्यादी अवशेष कापसाबरोबर एकत्र आल्यास अशा कापसाला बाजारभाव कमी मिळतो. ७. कापूस वेचणी करणाऱ्या मजुरांचे केस कापसात मिसळू नये म्हणून त्यांना टोप्या द्याव्यात तसेच वेचणीसाठी उपलब्ध असलेले गाऊन वापरावेत.

### साठवण करण्याची पद्धत

१. कापूस पिकाची वेचणी केल्यानंतर साठवणीसाठी नेताना कापसाला बांधावरील गवत तसेच काडीकचरा लागणार नाही याची काळजी घ्यावी. २. वेचणी केल्यानंतर २ ते ३ दिवस कापूस चांगला वाळवावा व त्यानंतरच साठवावा. ३. प्रत्येक वेचणीचा कापूस वेगळा व जातवार साठवावा. ४. कापसाच्या साठवणीसाठी मोकळी हवा असलेली व स्वच्छ जागा निवडावी. तसेच धूळ, धूर व उंदीर यांपासून कापसाचे संरक्षण करावे. ५. कापसाची साठवणूक स्वयंपाकघराच्या जवळ करू नये. धुरामुळे कापूस पिवळसर होतो तसेच आग लागण्याचा धोका संभवतो. ६. कापूस साठवताना त्यावर पाणी मारू नये. अशाने कापूस पिवळा पडतो. परिणामी कापसाची गुणवत्ता देखील खालावते व कापसाला भाव कमी मिळतो.

### प्रतवारी व विक्री

१. कापसाचा रंग, धाग्याची लांबी, धाग्याचा तलमपणा, धाग्याची तंतुशक्ती, धाग्याची पक्वता या गुणधर्मांना महत्त्व असल्याने कापसाची जातीनुसार लागवड, वेचणी व प्रतवारी केल्यास चांगला भाव मिळतो.

२. बाजारात कापूस नेताना त्यामध्ये काडीकचरा, पाल्याचे प्रमाण कमी असणे आवश्यक आहे.

३. वेचणी, साठवणूक करताना त्यामध्ये प्लास्टिक, कागद किंवा तत्सम वस्तूंची भेसळ होऊ न देणे आवश्यक आहे.

४. प्रतवारीनुसार कापूस विक्रीसाठी न्यावा तसेच शेवटचा वेचणीचा कापूस विक्रीसाठी वेगळा व सर्वात शेवटी न्यावा. ओलसर कापूस बाजारात नेऊ नये.

५. कापूस पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव झालेला असल्यास त्या अळीचे कोष साठवणुकीमधील कापसावर येण्याची शक्यता असते. म्हणून त्या गोदामात कामगंध सापळे तसेच प्रकाश सापळे लावून घ्यावेत, जेणेकरून त्यामधून निघालेले पतंग सापळ्यामध्ये अडकून पुढील प्रजोत्पादन थांबून किडीचा प्रसार होणार नाही.

कापसाचा भाव गुणवत्तेनुसार सध्या मिळत नसल्याने त्याकडे शेतकरी फारसे लक्ष देत नाहीत, त्याचबरोबर व्यापारी सुद्धा त्याबाबतीत दक्षता घेत नाहीत. यास्तव दोन्ही बाजूंनी प्रयत्न झाल्यास चांगल्या गुणवत्तेच्या कापसास आधुनिक पध्दतीच्या सूतगिरण्यांमध्ये चांगला बाजारभाव मिळू शकतो. त्यासाठी यापुढील काळात ठराविक गुणधर्म असलेला कापूस गट शेतीमधून किंवा शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून आणून त्याचे कंत्राटी पद्धतीने उत्पादन व विपणन करणे ही काळाची गरज आहे. म्हणून गुणवत्तेनुसार चांगले गुणधर्म असलेल्या वाणाची लागवड करून त्याची वेचणी, साठवण व प्रतवारी करताना वरीलप्रमाणे काळजी घेणे महत्त्वाचे आहे. आधुनिक प्रकारच्या सूतगिरण्यांसाठी चांगल्या प्रतीचा कापूस आवश्यक असल्याने नजीकच्या काळात या बाबींना अतिशय महत्त्व प्राप्त होणार आहे. या विषयाबद्दल शेतकरी बंधूंनी जागृत होऊन, गटशेतीमधून किंवा शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीने उत्पादन व विपणन केल्यास त्यांचा ब्रॅण्ड तयार होऊन, कापूस पिकापासून मिळणारा प्रतिहेक्टरी नफा वाढेल व शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल. ■